**MHAK110008082026**

**एम. जे. सी. क्र. १६२/२०२६ चे निशाणी क्र. १ खालील आदेश**
**अनिता व ईतर — वि.— निरंक**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन कायद्यानुसार दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, मयत नामे गुलाबचंद्र कर्णचंद्र अग्रवाल व मयत सुलोचना गुलाबचंद्र अग्रवाल यांचे अर्जदार क्र. १ ही सून, अर्जदार क्र.२ व ३ हे नातू, अर्जदार क्र.४ हा मुलगा व अर्जदार क्र.५ ही मुलगी आहेत. मयत गुलाबचंद्र कर्णचंद्र अग्रवाल व मयत सुलोचना गुलाबचंद्र अग्रवाल यांचा मृत्यु अनुक्रमे दि.२२.०६.२०२१ व दि.०३.०७.२०२५ रोजी झाला आहे. तसेच मयताचा मुलगा नामे गणेश उर्फ गणेशचंद्रजी गुलाबचंद्र अग्रवाल यांचा मृत्यु दि.१३.०३.२००४ रोजी झाला आहे. मयत गुलाबचंद्र कर्णचंद्र अग्रवाल व मयत सुलोचना गुलाबचंद्र अग्रवाल हे हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला येथील रहीवासी होते. अर्जदार असे कथन करतात की, मयत यांना अर्जदारांव्यतिरीक्त ईतर कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार हेच मयत गुलाबचंद्र कर्णचंद्र अग्रवाल व मयत सुलोचना गुलाबचंद्र अग्रवाल यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे. करिता अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे.

३. अर्जदारांनी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन काढून हरकत मागविण्यात आली. सदरचे जाहीर प्रगटन हे दिनांक २५.०४.२०२६ रोजीच्या 'दैनिक सायरन' आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले परंतु ३० दिवसांच्या कालावधीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर आणि विना आक्षेप चालविण्यात आले आहे.

४. अर्जदार क्र.२ याने त्याचे अर्जाचे पुष्ठर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ०८ दाखल केले. त्याने त्याच्या सरतपासात त्याच्या अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत.

अर्जदारांनी कागदोपत्री पुराव्यामध्ये मयत गुलाबचंद्र कर्णचंद्र अग्रवाल व मयत सुलोचना गुलाबचंद्र अग्रवाल यांचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेल्या प्रती अनुक्रमे नि.क्र.०९ व १० वर व गणेश उर्फ गणेशचंद्रजी गुलाबचंद्र अग्रवाल यांचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत नि.क्र.११ वर, अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या आधारकार्डाची पडताळणी केलेली प्रत नि. क्र. १२ ते १६ वर तसेच दिनांक २५.०४.२०२६ रोजीचे 'दैनिक सायरन' मध्ये प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन निशाणी क्र. १७ वर दाखल केलेले आहे. सदर अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदारांचा पुरावा व प्रस्तुत दस्ताऐवज विना उजर व आक्षेपविना राहीले आहे.

५. अर्जदारांनी पुरावा बंद केल्याबाबतची पुरसिस निशाणी क्र. १८ वर दाखल केली आहे. संपुर्ण दस्ताऐवजांचे अवलोकन केले असता व वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता, अर्जदार हेच मयत मयत गुलाबचंद्र कर्णचंद्र अग्रवाल व मयत सुलोचना गुलाबचंद्र अग्रवाल यांचे वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करिता खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात आला.

२. अर्जदार क्र. १ अनिता गणेश उर्फ गणेशचंद्रजी अग्रवाल, अर्जदार क्र.२ नयन गणेशचंद्रजी अग्रवाल, अर्जदार क्र.३ दिप गणेशचंद्रजी अग्रवाल, अर्जदार क्र.४ चंद्रशेखर गुलाबचंद्र अग्रवाल, अर्जदार क्र.१ ते ४ रा. फुले मार्केट जवळ, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला, अर्जदार क्र.५ पुष्पलता विजय खिवसरा, मांगलादेवी, ता. नेर, जि. यवतमाळ हे मयत गुलाबचंद्र कर्णचंद्र अग्रवाल व मयत सुलोचना गुलाबचंद्र अग्रवाल यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

NEHA VIJAY SHAHU
Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.07.02 17:09:47 +0530

(श्रीमती एन. व्ही. साहु)

दिनांकः–०२.०७.२०२६

दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,
तेल्हारा.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S. R. Adhau |
| Name of the Court | Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Telhara. |
| Date of Order /Judgment | 02.07.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. On | 02.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | 02.07.2026 |